# आदिवासी उपयोजनेतील आर्थिक उन्नतीच्या विविध योजना

**गणेश मधुकरराव धाये**
संशोधक
संशोधन केंद्र - महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

**प्रस्तावना**

सन १९७५-७६ पासुन एकात्मिकृत आदिवासी विकास प्रकल्पामध्ये (आयटीडीपी) सर्व मार्गांनी मिळणा-या निधीचा विनियोग करण्यासाठी आदिवासी उपयोजना (टिएसपी) सुरु करण्याची कल्पना साकार होऊ लागली. परिणामी आदिवासी उपयोजना आणि आदिवासी विकास प्रकल्प या दोन्ही संज्ञा परस्परांकरिता समान अर्थाने वापरल्या जाऊ लागल्या आणि आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रातच आदिवासी उपयोजना क्षेत्र असे संबोधण्यात येऊ लागले. राज्य शासनाने श्री. द. म. सुकथनकर, राज्य नियोजन मंडळाचे सदस्य आणि माजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन सदर समितीच्या अहवालातील शिफारशी स्विकारल्या आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९ टक्के आदिवासी लोकसंख्या आहे. त्यामुळे सदर लोकसंख्या विचारात घेऊन लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी जनतेच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशा आशयाची शिफारस सुकथनकर समितीने केली. सदर शिफारशीनुसार टप्प्या टप्प्याने ९ टक्के पर्यंत नियतव्यय उपलब्ध करुन द्यावयाचा होता. त्याप्रमाणे टप्पाटप्प्याने प्रतिवर्षी नियतव्ययात वाढ होऊन सन २००५-०६ पासुन सरासरी ९ टक्के नियतव्यय उपलब्ध होत आहे. सदर योजनांसाठी कमाल मर्यादेच्या अधिन राहुन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे जिल्हयातील अंमलबजावणी अधिका-यांकडुन आदिवासी उपयोजना क्षेत्र व बाहय क्षेत्रात राबविण्याच्या योजनांचे प्रस्ताव मागवितात व संकलित प्रारुप आराखडा तयार करुन जिल्हा नियोजन मंडळापुढे मंजुरीसाठी सादर करतात.

प्रत्येक जिल्हा नियोजन मंडळाने मंजूर केलेला जिल्हानिहाय प्रारुप आराखडा संकलीत करुन राज्याची जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना तयार होते. सदर योजनेत योजनानिहाय प्रस्तावित नियतव्ययास मंजूरी मिळाल्यानंतर मंजूर नियतव्यय अर्थसंकल्पीत करुन प्रत्येक विभागास मागणीप्रमाणे आदिवासी विकास विभाग तरतुद उपलब्ध करुन देते. त्याप्रमाणे संबंधित विभागाकडुन मार्गदर्शक सुचनाप्रमाणे खर्च करण्यांत येतो व खर्चाचा मासिक प्रगती अहवाल आदिवासी विकास विभागास सादर केला जातो. आदिवासी विकास विभागामार्फत जिल्हास्तरीय तसेच राज्यस्तरीय योजना राबविण्यात येत होत्या. सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात माहे डिसेंबर २०१० पासुन आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक टिएसपी-२००८/प्र.क्र.६/का-६, दिनांक १६ डिसेंबर २००९ अन्वये आदिवासी उपयोजना जिल्हा वार्षिक योजना निधी अर्थसंकल्पीत करणे, वितरीत करणे व या निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची सुधारीत कार्यपध्दती अंमलात आली आहे.

**संशोधन पद्धती**

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या विविध पद्धती आहेत. यापैकी प्रस्तुत शोध लेखासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. आदिवासी विकास योजना अभ्यासणे.
२. आदिवासी विकास योजनातून होणारे परिवर्तन अभ्यासणे.

**विविध विकास योजनांचा आढावा**

**१.ठक्कर बाप्पा एकात्मिक वरतीसुधार योजना**

राज्य शासनाने दलित बस्तो सुधार योजनेच्या धर्तीवर ठक्कर बाप्पा आदिवासी एकात्मिक कार्यक्रम राबविण्यात येतो. हा कार्यक्रम प्रस्थापित माडा, मिनीमाडा क्षेत्रावरोबर आदिवासी उपयोजना वाह्य क्षेत्रातील आदिवासी लोकसंख्यावर आधारित गावामध्ये ५० टक्के पेक्षा अधिक आदिवासींची लोकसंख्या असली पाहिजे. या योजनेअंतर्गत मुख्य बस्तीपासून जोडरस्ते, सिमेंट कॉंक्रीट, डांबरीकरणाचे अंतर्गत रस्ते, शाळेचे कंपाऊंड, जुन्या विहिरींची दुरुस्ती, नाली बांधकाम इत्यादी अंतर्गत लहान कामे करण्याला दिनांक २६ जून २००७ पासून मंजूरी दिली आहे. या योजनेमार्फत वस्तीचे विद्युतीकरण, समाज मंदिर, सार्वजनिक शौचालय, स्मशान भुमी, नदीकाठ, घाट बांधकाम व पर्यटन विकास इत्यादी कामे या योजनेमार्फत करण्यात येतात.

**२. कामगार कल्याण योजना**

कौशल्य व ज्ञान हे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी अत्यंत महत्वाचे घटक आहेत. कामागाराच्या कौशल्य क्षमतेनुसारच देशाची आर्थिक स्थिती जास्त उत्पादनशील नाविण्यपूर्ण व स्पर्धात्मक होते. राज्यात आदिवासी उपयोजनेअंतर्गत एकूण ५६ औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत असून त्यामधील विद्यार्थी प्रवेश क्षमता १०१८८ एवढी आहे. जिल्हास्तरावर खालील योजना आहेत.

१. प्रशासकीय इमारत व कार्यशाळा इमारत व वस्तीगृह बांधकाम करणे.
२. विद्यमान ओ. प्र. संस्थामध्ये नवीन व्यवसाय सुरु करणे.
१. 3. नवीन ओ. प्र. संस्थाची स्थापना करणे.
३. जादा मागणीचे व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करणे.
४. प्रोजेक्ट युनायटेड अंतर्गत आदिवासी उमेद्वारासाठी व्यवसायभिमुख शिक्षण व प्रशिक्षणाचे सार्वत्रिकरण करणे.
५. मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषांगिक सूचना केंद्राची स्थापना करणे.

कामगार आदिवासी कल्याण योजने अंतर्गत सन २०१३-१४ मध्ये कामगार व कामगार कल्याण (ओ.प्र.संस्था) या उपबिकास क्षेत्रांतर्गत जिल्हास्तरावरुन व राज्य स्तरावरुन एकूण रु. ७२८४.७५ लाख एवढा निधी उपलब्ध करुन दिला. शा. पोष्ट बेसीक आश्रम शाळेत व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात आली. यामुळे अनेक आदिवासी कुटूंबाना या योजनेचा फायदा झाला आहे.

**३. शबरी घरकुल योजना**

सन २०१२-१३ पासून आदिवासी कुटूंबांना राहण्यासाठी निवास मिळावा या करीता शबरी घरकुल योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेसाठी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात ५०००,०० लाखाची तरतूद उपलब्ध करुन देण्यात येतात.

**४. सामूहिक कन्यादान योजना**

आदिवासी समाजाचा लग्न समारंभासाठी मोठ्या प्रमाणात खर्च होत असतो. हा खर्च कमी करण्यासाठी विवाह सोहळ्यातील अनुचित प्रथांना आळा घालून सामूहिक विवाह सोहळ्यांना प्रोत्साहन देण्यावर भर दिला. या योजनेत सहभागी होणा-या आदिवासी दाम्पत्यांना आर्थिक सहाय्य देण्याची सामूहिक कन्यादान योजना प्रायोगिक तत्वावर राबविण्यास मंजूरी दिलेली अहे. अशा पध्दतीने लग्न करणा-या मंडळीना १०,०००० रुपयाचे अर्थ सहाय्य देऊन मंगळसुत्र व संसार उपयोगी भांडी देण्यात येतात. ही योजना आदिवासी भागातील १६ जिल्ह्याला लागू आहे.

**५. रुग्णालयीन अर्थ साहय्य**

या योजनेचा हेतू आदिवासी बालमृत्यू दर कमी करणे असा आहे. दुर्गम भागातील मुले रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्यांचा संपूर्ण खर्च करण्यात येतो. रुग्णांच्या पालकांना त्या कालावधीत दोन वेळेसचे मोफत जेबन व रोजगार देण्याची व्यवस्था केली जाते.

**६. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ (MSCTDE)**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ १९७२ रोजी स्थापन करण्यात आले. या महामंडळाची उद्दिष्टे खालील प्रमाणे विषद केली आहेत.

१. एकात्मिक खरेदी योजनेअंतर्गत आदिवासी भागात कृषीमाल व गौण बनोत्पादनाची खरेदी व विक्री करणे.
२. शासन, सार्वजनिक संस्था व महामंडळ यांच्या वतीने आदिवासी भागात एजन्सी तत्वाबर विकास कार्यक्रमाचे व्यवस्थापन करणे.
३. आदिवासी कुटूंबांना खावटी कर्जाचे वाटप करणे.
४. आर्थिक उत्पादनाच्या योजनांना कर्ज देणे.
५. आदिवासी विकासासाठी शासनाने सोपविलेली कार्यक्रम राबविणे.
६. आदिवासी क्षेत्रात रोजगाराचे कार्यक्रम विकसित करणे.

आदिवासी भागाचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकास महामंडळाची १९७२ मध्ये स्थापना केली आहे. या महामंडळामार्फत आदिवासी भागात महामंडळ एकाधिकार खरेदी, खावटी कर्जवाटप, राष्ट्रीय जाती-जमाती वित्तीय विकास महामंडळ, स्वयंरोजगार योजना, कर्ज योजना, मोटार पंप, इंजिन पंप, आश्रमशाळा व वस्तीगृहाना वस्तुचा पुरवठा इत्यादी वस्तुंचा पुरवठा करण्यात येतो.

**७. विद्युत मोटार पंप व ऑईल यांचा पुरवठा**

आदिवासी शेतकरी यांना शेतीचा विकास होण्याच्या दृष्टिने उपलब्ध असलेल्या साधनाचा व उर्जेचा पुरेपुर उपयोग करुन त्याद्वारे जास्तीत जास्त जमीन ओलीताखाली आणने हा उद्देश आहे. आदिवासींचा आर्थिक विकास

साधण्याच्या हेतूने १०० टक्के अनुदानावर विद्युत मोटार पंप व ऑईल इंजन पंप पुरवले जातात. पाण्याचा उपलब्ध स्त्रोत किमान सहा महिने उपलब्ध असावा आणि किमान जमीन ६० आर पासून ते कमाल १६ एकर पर्यंतची मर्यादा घालण्यात आली आहे.

**८. महिला व बालकल्याण समिती**

जिल्हा परिषदामध्ये ही समिती आहे. एकात्मिक बाल विकास योजना (ICDS) आणि एकात्मिक ग्राम विकास कार्यक्रम (IRDP) ग्रामीण भागामध्ये कार्यरत आहे. महिला बालविकास स्वयंरोजगारासाठी ग्रामीण लोकांना प्रशिक्षण, शिवणकाम यासारख्या योजना या समितीकडे सोपविल्या आहेत. या व्यतिरिक्त ही समिती शासनाच्या मार्गदर्शनाखाली लोकउपयोगी अनेक योजना तयार करते व महिला बालकल्याणाचे अनेक निर्णय घेते. कार्यक्रम राबविणे त्यासाठी आदिवासी उपयोजनेतून २०१३-१४ साठी १०२०.७४ लाख रुपये इतका निधी राखीव ठेवला आहे. ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेअंतर्गत ० ते ६ वयोगटातील मुले, गरोदर स्त्रिया ब स्तन-माता यांना पूरक आहार, लसीकरण आरोग्य तपासणी, पोषण, आरंग्य शिक्षण, अनौपचारिक शिक्षण, संदर्भ सेवा आवश्यकतेनुसार ५०० ते ६०० उष्मांक, व १८ ते २५ ग्रॅम प्रथिने पूरक पोषण आहारातून दिलो जातात. या कार्यक्रमासाठी आदिवासी उपयोजनेतून २०१३-१४ साठी एकूण जिल्हा स्तर, राज्य स्तर व अंगणवाडी बांधकामासाठी असा एकूण ४९३२.५८ लाख रुपये इतका निधी राखून ठेवला आहे.

**९. पाईपचा पुरवठा**

आदिवासींचा मुख्य व्यवसाय शेती असल्यामुळे त्यांची आर्थिक उन्नती करण्यासाठी लाभधारकाना न्यूक्लिअस वजेट योजनेअंतर्गत पी.व्ही.सी. पाईपचा पुरवठा केला जातो. न्यूक्लिअस योजना राववतांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी विचारात घेऊन पी.व्ही.सी. पाईप अशी नवी योजना प्रस्तावित केली आहे. एका लाभधारकाला २१० मीटर पर्यंत १५००० हजार रुपये आर्थिक मदत दिली जाते.

**१०. न्युक्लिअस बजेट योजना**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या विशिष्ट गरजा लक्षात घेऊन आदिवासी उपयोजना तयार करण्यात येते. प्रकल्प क्षेत्रातील स्थानिक गरजा ह्या शासनाने मान्य केलेल्या नियमित योजनाहून भिन्न असतात. ज्या योजना आदिवासी विकास किंवा कल्याणाच्या दृष्टिने स्थलकालनुरुप आवश्यक आहेत पण त्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात नाही. अशा स्थानिक महत्त्वाच्या योजना तांत्रिक औपचारिकतेमुळे दीर्घ कालावधीकरिता प्रलवित न पडता स्थानिक पातळीवर तातडीने व प्रभावीपणे कार्यान्वित करुन त्यांचा लाभलाभार्थ्यांना मिळवून देण्यात येतो. लाभार्थी व्यक्तीना या योजनेच्या माध्यमातून ८५ टक्के, ९५ टक्के आणि १०० अनुदान दिले जाते.

**११. भुमिहिन आदिवासींचे सबलीकरण व स्वाभिमान योजना**

दारिद्र रेषेखालील भुमिहिन आदिवासींना उपजिवीकेसाठी कायमस्वरुपी उत्पन्नाची सोय व्हावी म्हणून शासनाने, आदिवासी सबलीकरण व स्वाभिमान योजना राबविण्याचे ठरविले आहे. या योजनेतंर्गत ४ एकर कोरडवाहू जमीन किंवा २ एकर ओलीताखाली जमीन दारिद्र रेषेखाली भुमिहिन आदिवासी कुटुंबाना देण्यात येणार आहे. जमीनीच्या खरेदीची एकूण किंमतीच्या ५० टक्के रक्कम अनुदान रुपात व ५० टक्के रक्कम बिनव्याजी कर्जाद्वारे देण्यात येणार आहे.

**१२. शबरी विकास महामंडळ आर्थिक सहाय्य**

राज्यातील सुशिक्षित बेरोजगार आदिवासी युवक युवतींना स्वयंरोजगार निर्मितीसाठी मुदतकर्ज, मार्जिन मनी, बीज भांडवल इत्यादी स्वरुपात कर्ज योजना राबविल्या जातात. आदिवासी उपयोजनेतून २०१३-१४ साठी शवरी विकास महामंडळाला अनुदानासाठी ७५०.०० लाख रुपये आणि भाग भांडवलासाठी १०००.०० लाख निधी मंजूर केला आहे.

**१३. नव संजीवन योजना**

आदिवासी लोकांसाठी निरनिराळ्या योजनांची एकात्मिकपणे व समन्वयाने अंमलबजावणी करणे आणि त्यांना बळकटी देणे हे नवसंजीवन योजनेचे उद्दिष्ट्ये आहे. नवसंजीवन योजनेची आदिवासी उपयोजना क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र मिनिमाडा क्षेत्रखंड आणि राज्यातील क्षेत्रखंड यामध्ये अंमलबजावणी करण्यात येते. नव संजीवन योजने अंतर्गत पुढील तक्तत्यातील योजना राबविल्या जातात.

**सारांश**

ठक्कर बाप्पा एकात्मिक वरतीसुधार योजना, कामगार कल्याण योजना, शबरी घरकुल योजना, सामूहिक कन्यादान योजना, रुग्णालयीन अर्थ साहय्य महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ (MSCTDE), विद्युत मोटार पंप व ऑईल यांचा पुरवठा, महिला व बालकल्याण समिती, पाईपचा पुरवठा, न्युक्लिअस बजेट योजना, भुमिहिन आदिवासींचे सबलीकरण व स्वाभिमान योजना, शबरी विकास महामंडळ आणि आर्थिक सहाय्यनव संजीवन योजना इत्यादी योजनांमुळे आदिवासी समाजामध्ये पूर्णपणे परिवर्तन झाले नसले तरी त्यांच्यात टप्प्या-टप्प्याने परिवर्तन होताना दिसून येत आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

- World Bank report 1998 oxford University Press New Delhi
- Bailey F G - Caste and economic frontier A Village in highland Orissia Oxford university press Bombay
- Bose NK Nandi Das and Tyagi DS- Tribal of Village system Present life in India Calcutta Geographical survey of India
- Banerjee HN - The import of tea on the Tribals of West Bengal Calcutta Cultural institute government of west Bengal
- Naik T B- Economic organization and market Chindware Tribals Research institute Simla
- Saksena R - Tribal economic in central India Research Calcutta.